आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ जुलै २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आर्थिक वर्ष २०२३-२४ वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल लोकसभेत सादर/ जीडीपी वाढीचा दर साडेसहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज

- नीट युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटण्याचा प्रकार केवळ पाटणा इथं झाल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचं लोकसभेत प्रतिपादन

- सर्व राजकीय पक्षांनी आपली पक्षीय धोरणं बाजूला ठेवून पुढच्या साडे चार वर्षांसाठी स्वतःला देशासाठी समर्पित करावं असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन

- अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीतून जो बायडेन यांची माघार/ कमला हॅरिस डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार

- पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारतीय ऑलिम्पिक संघटनेला बीसीसीआय कडून साडे आठ कोटी रुपये अर्थसहाय्य

**आणि**

- महाराष्ट्रात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**<><><><><>**

२०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात आर्थिक वर्ष २०२४-२५ वर्षासाठी स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडे सहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकसभेत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला.

जागतिक स्तरावर आर्थिक कामगिरीत अनिश्चितता असताना आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशांतर्गत वाढीला चालना देणाऱ्या घटकांमुळे आर्थिक वाढीला मदत मिळाली असल्याचं अहवालात म्हटलं आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प त्या उद्या लोकसभेत सादर करतील.

केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन, आज दुपारी अडीच वाजता आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४ संदर्भात राष्ट्रीय मीडिया सेंटर इथं पत्रकार परिषदेला संबोधित करणार असल्याची माहिती अर्थ मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

नीट युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटण्याचा प्रकार केवळ पाटणा इथं झाल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज लोकसभेत सांगितलं. नीट परीक्षेतल्या घोटाळ्याची चौकशी सीबीआय मार्फत चालू असून याप्रकरणी न्यायलयात सुनावणी सुरु आहे. असं ते म्हणाले. देशभरात ४हजार ७०० केंद्रांवर नीट युजी परीक्षा घेण्यात आली. त्यातल्या एका केंद्रावरच अनियमतता झाल्याची नोंद आहे, असं एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात त्यांनी सांगितलं. लोकसभेतले विरोधी पक्ष नेता राहुल गांधी यांनी देशात स्पर्धापरीक्षा यंत्रणेबद्दलचा मुद्दा उपस्थित केला. राज्यसभेत आज इतर कामकाज बाजूला ठेवून कावड यात्रेसंबंधी उत्तर प्रदेश सरकारने जारी केलेल्या नव्या नियमावलीच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी विरोधी पक्षांनी केली. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी ती नाकारली.

**<><><><><>**

संसदेत उद्या सादर होणारा अर्थसंकल्प हा अमृत काळातला महत्वाचा अर्थसंकल्प असेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होण्याआधी संसद भवन परिसरात ते बातमीदारांशी बोलत होते. हा अर्थसंकल्प पुढच्या पाच वर्षांची दिशा ठरवणार असून सरकारच्या विकसित भारत संकल्पनेचा पाया घालण्याचं काम याद्वारे होईल. भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे, देशात होणाऱ्या गुंतवणुकीमुळे इथं संधीची विपुलता आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. आपण जनतेला दिलेल्या हमीची अंमलबजावणी करण्यासाठी सरकार कार्यरत असल्याचंही मोदी यांनी सांगितलं.

मोदी यांनी यावेळी विरोधी पक्षांवर टीका केली. विरोधक आपलं अपयश झाकण्यासाठी संसदेतला वेळ खर्ची घालत आहेत. संसदेत आपला आवाज दाबण्याचा प्रयत्न विरोधक करत असून लोकशाहीत असे प्रकार चालत नाहीत, असंही ते म्हणाले.

सर्व राजकीय पक्षांनी आपली पक्षीय धोरणं बाजूला ठेवून पुढच्या साडे चार वर्षांसाठी स्वतःला देशासाठी समर्पित करण्याचं आवाहन मोदी यांनी केलं. राजकीय पक्षांनी २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीवेळी राजकारण करावं, मात्र तोपर्यंत शेतकरी, युवक आणि देशाच्या सक्षमीकरणासाठी काम करावं असंही मोदी म्हणाले.

**<><><><><>**

देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या पद्म पुरस्कारांसाठी १५ सप्टेंबर पर्यंत नामांकन दाखल करता येणार आहे. राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर पद्म पुरस्कारांसाठी नामांकन आणि शिफारशी नोंदता येतील, असं केंद्रीय गृह मंत्रालयाने

म्हटलं आहे. पद्म पुरस्कारांमध्ये पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री यांचा समावेश आहे. पुरस्कारांची घोषणा दरवर्षी प्रजासत्ताक दिनी केली जाते.

**<><><><><>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांमध्ये भाग घ्यायला सरकारी कर्मचाऱ्यांना असलेली बंदी केंद्र सरकारनं उठवली आहे. तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी नोव्हेंबर १९६६मध्ये ही बंदी लागू केली होती. ती मागे घेण्याचा निर्णय कर्मचारी, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन मंत्रालयानं घेतला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी येत्या नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली आहे. बायडेन यांनी काल समाजमाध्यमावर ही घोषणा केली. तसंच त्यांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी उप राष्ट्राध्यक्ष कमला हॅरीस यांना आपला पाठिंबा जाहीर केला. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष म्हणून काम करणं ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट असून डेमॉक्रॅटिक पार्टी आणि देशाच्या हितासाठी अध्यक्षपदाच्या उर्वरीत काळात आपलं कर्तव्य पूर्ण करण्यावर लक्ष देणार असल्याचं बायडेन म्हणाले. या आठवड्याच्या शेवटी आपण देशाशी सविस्तर संवाद साधणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारतीय ऑलिम्पिक संघटनेला साडे आठ कोटी रुपये देण्याची घोषणा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शाह यांनी केली आहे. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी या आर्थिक मदतीबद्दल शाह यांचे आभार मानले आहेत. पॅरिस ऑलिम्पिकसाठी

भारतीय संघात ७० पुरुष आणि ४७ महिलांसह ११७ खेळाडूंचा समावेश आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ या महिन्याच्या २६ तारखेपासून सुरू होणार आहे.

<><><><><>

उत्तरप्रदेशातल्या लखीमपूर खेरी इथं २०२१ साली झालेल्या हिंसाचार प्रकरणी माजी केंद्रीय मंत्री अजय मिश्रा यांचा मुलगा आशीष मिश्रा याला सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. मात्र आशीष मिश्रा याला दिल्ली किंवा लखनौ च्या बाहेर जायला मज्जाव करण्यात आला आहे. सत्र न्यायालयाने याप्रकरणी लवकर सुनावणी घ्यावी असे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. लखीमपूर खेरी इथं झालेल्या हिंसाचारात आठ जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

मणिपूरच्या विविध जिल्ह्यांमध्ये तसंच दुर्गम भागांमध्ये आज पोलिसांनी छापेमारी करत शोधमोहीम राबवली. या शोधमोहिमेत विविध कलमांतर्गत ४७ जणांना ताब्यात घेतलं आहे. राज्यात जीवनावश्यक वस्तू आणि पदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय महामार्गावर ठिकठिकाणी कडेकोट सुरक्षा व्यवस्था केली आहे. संवेदनशील भागात पोलीस बंदोबस्त असून विविध जिल्ह्यांमध्ये १०२ ठिकाणांवर पोलिसांनी नाकेबंदी करत चौक्या उभारल्या आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात ठिकठिकाणी कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचलंय, तर ठिकठिकाणी नदी नाल्यांचे प्रवाह फुगले आहेत.

विदर्भात नागपूर वेधशाळेनं अतिवृष्टीचा इशारा दिला असून चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतल्या सर्व शाळा आणि महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

राजधानी मुंबईत शहर भागात ८२ मिलीमीटर, पूर्व उपनगरात ९६ तर पश्चिम उपनगरात ९० मिलीमीटर पावसाची नोंद झाली. आजही पाऊस कायम असल्याने मुंबईत ठिकठिकाणी पाणी साचून वाहतूक कोंडी झाली. रस्ते आणि रेल्वे वाहतूक तसंच विमानसेवेवरही परिणाम झाला आहे. उपनगरी रेल्वेच्या मध्य आणि हार्बर मार्गावरही काही ठिकाणी पाणी साचलं आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी गरज असेल तर घराबाहेर पडावं आणि आपत्कालीन परिस्थितीत १०० क्रमांकाशी संपर्क साधावा, असं आवाहन मुंबई पोलिसांनी केलं आहे. काल मुंबई विमानतळावरची ३६ उड्डाणं पावसामुळं रद्द झाली.

दुपारी बारा वाजेपासून भरतीची वेळ असल्यानं किनारी भागातल्या शाळांना प्रशासनानं सुट्टी दिली आहे.

**<><><><><>**

दक्षिण आशियातल्या देशांसाठी नवीन उपक्रम, उद्योजकता आणि बौद्धिक संपदा निर्मितीसाठी निती आयोग आणि जागतिक बौद्धिक अधिकार संघटना यांनी पुढाकार घेतला आहे. आज नवी दिल्लीत झालेल्या एका कार्यक्रमात यासाठी संयुक्त कार्यक्रमच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

**//<><><><><>//**